T2/329/2017

**अत्यंत तातडीचे**

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

माहितीचा अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुके/१/कावि/९६५/२०१७
दिनांक :- २२ /०५/२०१७

**विषय :- माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत श्री.राजू सुदाम भालेराव यांनी सादर केलेल्या अर्जांच्या छायांकित प्रती पाठविणेबाबत...**

**संदर्भ :- श्री.कैलास मुळीक यांचा माहिती अधिकारातील अर्जाची छायांकित प्रत.**

**परिपत्रक,**

श्री.कैलास मुळीक, यांनी श्री.राजू सुदाम भालेराव यांचे सन २०१५-१६ ते सन २०१६-१७ या वर्षात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या किती विभागात माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज केले व सदर अर्जांच्या छायांकित प्रती मिळणेबाबत दि.१५/०५/२०१७ रोजी प्रशासन विभागात माहिती अधिकारात अर्ज सादर केला आहे.

प्रशासन अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी, प्रशासन विभाग यांनी सदर अर्जामधील माहिती मनपाच्या सर्व विभागांशी निगडीत असलेने सदरचा अर्ज इकडील विभागाकडे दि.१६/०५/२०१७ रोजी हस्तांतरीत केला आहे.

तरी, या परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळविणेत येते की, आपले विभागात श्री.राजू सुदाम भालेराव यांनी सन २०१५-१६ ते सन २०१६-१७ या वर्षात माहिती अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत सादर केलेल्या अर्जांच्या छायांकित प्रती दि.२४/०५/२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत मुदतीत नागरी सुविधा केंद्र विभागाकडे आपले खास दूतामार्फत पाठविणेत यावेत. सदरची माहिती निरंक असल्यास तसा निरंक अहवाल पाठविणेत यावा. सदर माहिती तात्काळ श्री.कैलास मुळीक यांना उपलब्ध करुन द्यावयाची असलेने आणि माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील अटी व शर्तींनुसार ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची असलेने याकामी विलंब होता कामा नये. **जे विभाग विहीत मुदतीत सदरची माहिती पाठविणार नाहीत अशा विभागांचे जनमाहिती अधिकारी यास जबाबदार राहतील** याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,**
नागरी सुविधा केंद्र,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८

प्रति,

------------------------------------ विभाग
जनमाहिती अधिकारी तसेच विभागप्रमुख

**प्रतिलिपी,**

**श्री.कैलास मुळीक, रुपीनगर, माऊली सोसायटी, पुणे**

महाशय,

२/- आपला दिनांक नसलेला अर्ज प्रशासन विभागाकडून इकडील नागरी सुविधा केंद्र विभागाकडे प्राप्त झाला असून आपण श्री.राजू सुदाम भालेराव यांनी माहिती अधिकारात केलेल्या अर्जांच्या छायांकित प्रतींची मागणी केलेली आहे. सदर माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व विभागांशी निगडीत असलेने सर्व विभागांना या परिपत्रकान्वये माहिती सादर करणेबाबत कळविले आहे. तरी सदर माहिती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभागांकडून प्राप्त होताच संकलित करुन आपणास पाठविणेत येईल.